**शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जि.प., ठाणे या कार्यालयातील मुख्याध्यापकाची ०२ पदे शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जि.प., ठाणे या कार्यालयात वर्ग करण्याबाबत....**

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
**शासन निर्णय क्र. सेवार्थ २०१८/प्र.क्र.७०/१८/प्रशा-५**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय (विस्तार इमारत), मुंबई - ४०० ०३२
दिनांक - १७ एप्रिल, २०१८

**संदर्भ** : १) शासन निर्णय क्र.संकीर्ण-१००२/(१५९/०२)/प्रशा-५, दिनांक १७ मार्च २००३
२) शिक्षण उपसंचालक, मुंबई विभाग, मुंबई यांचे पत्र क्रमांक शिउसं/आस्था- ३/२०१८/३०५-०६, दि. ०६ मार्च २०१८.

**प्रस्तावना :**

संदर्भाधिन क्रमांक १ येथील शासन निर्णयान्वये शालेय शिक्षण विभागाच्या आकृतीबंधास मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, ठाणे या कार्यालयामध्ये “ब” संवर्गातील मुख्याध्यापकाची ०२ पदे मंजूर करण्यात आलेली आहेत. मात्र सदर पदांची नोंद शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, ठाणे या कार्यालयाच्या सेवार्थप्रणालीमध्ये घेण्यात आली असून वेतनही त्याच कार्यालयाच्या आस्थापनेवरुन अदा करण्यात येत आहे.

संदर्भाधिन शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आलेल्या आकृतीबंधानुसार शालेय शिक्षण विभागांतर्गत मुख्याध्यापकाची पदे संबंधित जिल्ह्यातील शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, या कार्यालयामध्ये समाविष्ट असून केवळ ठाणे जिल्ह्यामध्ये सदर पदे शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद या कार्यालयामध्ये समाविष्ट करण्यात आली आहेत. सबब राज्यात पदांच्या बाबतीत एकसुत्रता असावी याद्दष्टीने शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, ठाणे या कार्यालयाच्या आकृतीबंधात मंजूर असलेली मुख्याध्यापकाची ०२ पदे वगळून ती शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, ठाणे या कार्यालयाच्या आकृतीबंधात समाविष्ट करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय :**

विभागाच्या संदर्भाधिन दि. १७ मार्च २००३ च्या शासन निर्णयान्वये निश्चित केलेल्या आकृतीबंधानुसार मुख्याध्यापक या पदनामाची पदे संबंधित जिल्ह्यातील शिक्षणाधिकारी (प्राथमिक), या कार्यालयामध्ये समाविष्ट असल्याने राज्यात पदांच्या बाबतीत एकसूत्रता व्हावी याद्दष्टीने शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, ठाणे या कार्यालयाच्या आकृतीबंधातील मुख्याध्यापकाची ०२ पदे सदर कार्यालयातून वगळून शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, ठाणे या कार्यालयात समाविष्ट करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर शासन निर्णय, वित्त विभागाच्या शासन निर्णय क्रमांक संकीर्ण २०१५/प्र.क्र.४१/अर्थ-१, ०२ जून २०१५ अन्वये या विभागास प्राप्त अधिकारांचा वापर करुन निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०४१८१५३९३६५८२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ravindra Pralhad Ate

Digitally signed by Ravindra Pralhad Ate
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sport Departrment, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=fd5fc4fce5f6732e6657dca817ae6ee619a55d170d3c93eff53c3ca69d1a772d, serialNumber=eaa37af2edb5809b000f33d26328f6cdac80ee32afdac3f68b5821d14e41dffa, cn=Ravindra Pralhad Ate
Date: 2018.04.18 15:40:45 +05'30'

(र.प्र.आटे)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१. आयुक्त, शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
२. विभागीय शिक्षण उपसंचालक, मुंबई विभाग, मुंबई
३. शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जि.प., ठाणे
४. शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जि.प., ठाणे
५. वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई ४०००३२
६. निवडनस्ती (प्रशा-५), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.